दैनिक
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
जनप्रभात
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

जिथे गाव.. तिथे वार्ताहर..!
महाराष्ट्रात
सातारा सांगली कोल्हापूर रायगड सिंधुदुर्ग
जिल्हा,तालुका,शहर आणि ग्रामीण भागामध्ये
पत्रकार /वार्ताहर,छायाचित्रकार आणि जाहिरातदार नेमनेआहेत.
दैनिक जनप्रभात सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
या लोकप्रिय वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
पात्रता
१. समाजसेवेची आवड
२. जनसंपर्क
३. स्मार्ट फोन असणे आवश्यक
४. सोशल मीडियाचा वापर करता येणे
7875613619,883006884
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

✻ (आष्टी) वर्धा ✻ सोमवार, ९ मार्च २०२६ ✻ वर्ष ४ थे ✻ अंक ९३ ✻ पृष्ठ ६ ✻ मूल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

जागतिक महिला दिनाच्या मुहुर्तावर आरोग्य विभागाकडून 'एचपीव्ही लसीकरण' मोहिमेचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुभारंभ

९.८४ लाख मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण

मुंबई, दि. ८:
राज्यातील मुलींना गर्भाशय मुखाच्या (सर्व्हायकल) कर्करोगापासून संरक्षण मिळावे यासाठी ९ ते १४ वयोगटातील सुमारे ९ लाख ८४ हजार मुलींना एचपीव्ही प्रतिबंधक लस देण्याच्या मोहिमेचा शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबई येथे झाला. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, "आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत, बदललेल्या आहारपद्धतीत आणि वाढत्या तणावामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा 'प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर' या तत्त्वानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एचपीव्ही लसीकरण हा त्याच दिशेने टाकलेले स्तुत्य पाऊल असल्याचे सांगितले." त्यांनी सांगितले की, राज्यातील ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना एचपीव्ही लस देण्याची ही व्यापक मोहीम राबवली जात असून त्यामुळे गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रभावी प्रतिबंध घालता येईल. जागतिक स्तरावर कर्करोग हा गंभीर आरोग्यविषयक प्रश्न बनत असताना राज्य सरकार या संदर्भात सक्रिय पावले उचलत आहे.

'माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित'
मुख्यमंत्री असताना राबवलेल्या 'माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित' या उपक्रमाची आठवण करून देताना शिंदे म्हणाले की, त्या मोहिमेत ३ कोटी महिलांची तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी जवळपास १० हजार महिलांमध्ये कर्करोगाचे प्रारंभिक निदान झाले. आजार पहिल्या टप्प्यात सापडल्यामुळे अनेक मातांभगिनींचे प्राण वाचवणे शक्य झाले, याचा खरा आनंद आहे. अलिकडेच सुरू करण्यात आलेल्या मेमोग्राफी तपासणीच्या आठ गाड्यांद्वारे गावागावात तपासणी सुरू असून आतापर्यंत २ कोटी ९१ लाख महिलांची तपासणी झाली आहे. गरज भासल्यास आणखी गाड्या उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्न करेल, असे त्यांनी सांगितले. यासाठी डीपीडीसी, जीएसआर तसेच राज्याच्या आरोग्य बजेटमधून निधी उपलब्ध करण्याचा विचार करता येईल, असेही त्यांनी नमूद केले. राज्यातील अनेक रुग्णालयांच्या इमारती ६० ते ७० टक्के पूर्ण झाल्या असून त्या लवकरात लवकर १०० टक्के पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी कमी व्याजदरात निधी मिळवण्यासाठी एडीबी बँक, वर्ल्ड बँक यांसारख्या संस्थांकडूनही आर्थिक सहाय्य मिळवण्याचा प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले. तसेच पीपीपी (Public Private Partnership) मॉडेलद्वारे आरोग्य क्षेत्रातील पायाभूत



सुविधा उभारण्यालाही मान्यता देण्यात आली आहे. नामांकित संस्थांच्या सहकार्याने आधुनिक आरोग्य सुविधा उभारल्या जातील, ज्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांनाही मिळेल. मुख्यमंत्रीपदाच्या काळात राबवलेल्या 'शासन आपल्या दारी' उपक्रमाचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले की, या मोहिमेमुळे सुमारे ५ कोटी नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळाला. याच धर्तीवर आता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'आरोग्य आपल्या दारी' ही संकल्पना पुढे आणली असून आरोग्य सेवा थेट लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मोठा प्रयत्न केला जाणार आहे. आरोग्यमंत्री असताना दुर्गम भागातील दौऱ्यांचा अनुभव सांगताना शिंदे म्हणाले की, राज्याच्या सीमेवरील रंगुबेली सारख्या दुर्गम गावांमध्येही त्यांनी भेट देऊन आरोग्य व्यवस्थेची पाहणी केली. स्वातंत्र्यानंतर कोणीही मंत्री त्या भागात पोहोचला नव्हता, असे स्थानिक नागरिकांनी सांगितल्याचे त्यांनी नमूद केले. या अनुभवातून दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट झाले, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री असताना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून ७० ते ८० हजार रुग्णांना सुमारे ४५० कोटी रुपयांची मदत देण्यात आली, अशी माहिती शिंदे यांनी दिली. आजही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या निधीतून मोठ्या प्रमाणावर रुग्णांना मदत मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्य सरकार महिलांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असल्याचे सांगताना त्यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना', 'लाडकी लखपती योजना', एसटी प्रवासात ५० टक्के सवलत तसेच नावासमोर आईचे नाव लावण्याचा ऐतिहासिक निर्णय यांचा उल्लेख केला. "महिलांचे आरोग्य चांगले असेल तरच कुटुंब आणि समाज मजबूत राहतो. घराचा कणा ही आई, बहीण आणि पत्नी असते. त्यामुळे महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे," असे त्यांनी सांगितले. जागतिक महिला दिनानिमित्त सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिला डॉक्टर, शल्यचिकित्सक, परिचारिका आणि आरोग्य सेविकांचा सत्कार करण्यात आला. महिला सर्व क्षेत्रात आघाडीवर असल्याचे सांगताना शिंदे यांनी जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले यांचे उदाहरण देत महिलांच्या योगदानाचे कौतुक केले. तसेच देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या महिला असल्याचा अभिमानही त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत गर्भाशय मुखाच्या कर्करोगावरील एचपीव्ही लसीकरण देशभर सुरू करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले. राज्यात ९ ते १४ वयोगटातील ९.८४ लाख मुलींना एचपीव्ही लस देण्याचा हा मोठा उपक्रम असल्याचे सांगून शिंदे यांनी आरोग्य विभागातील अधिकारी, डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले. "आपल्या एका प्रयत्नातून एखादा जीव वाचला तर त्यामागील संपूर्ण कुटुंब वाचते. त्यामुळे आरोग्य विभाग हा खऱ्या अर्थाने जीव वाचवणारा सेवाधर्मी विभाग आहे," असे सांगून त्यांनी या उपक्रमासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव निपुण विनायक, आरोग्य विभागाच्या आयुक्त डॉ. कांदबरी बलकवडे आणि इतर सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ठाणे, दि.०८ (जिमाका) :
जागतिक महिला दिन आणि समाजसुधारक डॉ.मुत्थुलक्ष्मी रेड्डी यांच्या विधानमंडळ सदस्यत्वाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'विकसित भारत नारी शक्ती संगम' ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेत महिलांना अधिकाधिक संधी दिल्यास सक्षम नेतृत्व घडते, यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मीरा-भाईंदरजवळील उत्तन येथे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम) यांच्या संयुक्त विद्यमाने ८ व ९ मार्च २०२६ रोजी 'विकसित भारत नारी शक्ती संगम' या दोन दिवसीय ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, पद्मश्री पोपटराव



पवार, प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, मीरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, अपर तहसिलदार निलेश गौड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढणे ही काळाची गरज आहे. महिलांना योग्य संधी दिल्यास त्या प्रभावी नेतृत्व घडवू शकतात आणि समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शासनाच्या विविध योजनांद्वारे महिलांच्या सक्षमीकरणाला चालना दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. 'लखपती दीदी' योजनेंतर्गत यावर्षी ३७ लाख महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले असल्याची माहिती त्यांनी दिली. उद्योग आणि स्टार्टअप क्षेत्रात महाराष्ट्रातील महिलांनी देशात अग्रक्रम मिळवला असल्याचेही त्यांनी नमूद केले. या परिषदेत देशभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या सुमारे ५०० ग्रामीण महिलांचा सहभाग असून, व्यवसाय, उद्योग, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या यशस्वी वाटचालीचे अनुभव या व्यासपीठावरून मांडले जाणार आहेत. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त करताना, महाराष्ट्रातील निवडून आलेल्या तसेच भविष्यात निवडून येणाऱ्या महिला सरपंचांसाठी प्रशिक्षण शिबिरे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे आयोजित करण्यात यावीत, अशी सूचना केली. यामुळे सुशासनाला चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले. परिषदेचे प्रास्ताविक प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी केले. पद्मश्री पोपटराव पवार यांनी स्वागतपर भाषण केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी विधान परिषद सदस्या रेखाताई महाजन तसेच मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर डिंपल मेहता यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती.

या परिषदेत ग्रामीण महिलांच्या नेतृत्व विकास, उद्योजकता आणि सामाजिक परिवर्तनातील योगदानावर विविध सत्रांमध्ये चर्चा होणार असून, काही विशेष महिलांचे प्रेरणादायी अनुभव कथनही सादर करण्यात येणार आहे.

प्रत्येक मुलीने 'एचपीव्ही' लसीकरणाचा लाभ घ्यावा

- पालकमंत्री जयकुमार रावल

धुळे, दि. 8 मार्च 2026 (जिमाका वृत्त):
महिलांमधील गर्भाशयमुख कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी 14 वर्षे पूर्ण झालेल्या परंतु 15 वर्षे पूर्ण न झालेल्या जिल्ह्यातील प्रत्येक मुलीने एचपीव्ही लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालय, दोंडाईचा येथे आज सायंकाळी जिल्हास्तरीय 'एचपीव्ही' लसीकरण मोहीमेचा शुभारंभ कार्यक्रम झाला. त्यावेळी पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. या कार्यक्रमास उद्योगपती सरकारसाहेब रावल, नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष विजय पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगांवकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मनिष पवार, जिल्हा समाजकल्याण अधिकारी नितीन खंडेराय, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्निल पाटील, अधीक्षक डॉ. भरत कुलकर्णी, डॉ. संजय मोरे, गट विकास अधिकारी रमेश नेतनराव, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. रुचिता पवार आदी उपस्थित होते.





पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 28 फेब्रुवारी 2026 रोजी या मोहिमेची राष्ट्रीयस्तरावर सुरुवात केली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून प्रत्येक राज्याने आपल्या क्षेत्रात एचपीव्ही लसीकरण प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार राज्य शासनानेही ही मोहीम स्वीकारत जागतिक महिला दिनानिमित्त तिची सुरुवात केली असून साधारणतः 90 दिवस ही मोहीम चालणार आहे. ते पुढे म्हणाले की, पूर्वी महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण तुलनेने कमी होते. सध्या महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. गर्भाशयमुख कर्करोगासारख्या आजारावर लसीकरणाच्या माध्यमातून 99 टक्क्यांपर्यंत प्रतिबंध घालता येऊ शकतो. आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा 'प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर' या तत्त्वानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने धुळे जिल्ह्यात एचपीव्ही लसीकरण मोहिमेची सुरुवात झाली आहे. पुढील 90 दिवसांत आशा वर्कर, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, ग्रामसेवक, तलाठी, विविध सामाजिक संस्था तसेच महिला बचत गटांनी जिल्ह्यातील 14 ते 15 वर्ष वयोगटातील प्रत्येक मुलीपर्यंत पोहोचून त्यांना लसीकरणाचे महत्व समजावून जवळच्या शासकीय रुग्णालयात लसीकरणासाठी आणुन धुळे जिल्ह्यात सुरू झालेली ही मोहीम शंभर टक्के लाभार्थ्यांपर्यंत पोहचावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. पालकमंत्री श्री.रावल यांच्या हस्ते जागतिक महिला दिनानिमित्त सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आरोग्य क्षेत्रातील कर्तृत्ववान महिला डॉक्टर्स, परिचारिका, आरोग्य सेविका, आशा सेविका यांचा प्रशस्तीपत्रक देवून सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. देगांवकर यांनी एचपीव्ही लसीकरणाबाबत माहिती दिली. प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बोडके यांनी तर सुत्रसंचलन आरोग्य सेवक अनिल भोई यांनी केले.

संपादकीय...

भविष्यात पैशाचे महत्त्व शुन्य नि काम ऐच्छिक ठरेल

आर्टिफिशियल इंटेलिजेन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आजच्या काळातील सर्वात परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक आहे. हे आपले जीवन, कार्यपद्धती आणि संवाद साधण्याची पद्धत बदलत आहे. एआय हे एकप्रकारे मशीनच्या रुपात मानवाप्रमाणे समस्या सोडवणे, निर्णय क्षमता, तर्कसंगतता व नवीन गोष्टी शिकण्याचे काम करते. आर्टिफिशियल इंटेलिजेन्सची संकल्पना प्राचीन काळापासूनची असून यात अनेक कथांचा देखील समावेश आहे. एआयचा औपचारिक अभ्यास हा २० व्या शतकात सुरु झाला. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी सर्वात प्रथम डार्टमाउथ कॉन्फरन्समध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजेन्स' ही संकल्पना वापरली. येथूनच एआयच्या अभ्यासाला सुरुवात झाली. एआयच्या विकासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९५० मध्ये ॲलन ट्युरिंग यांनी केलेली ट्युरिंग चाचणी. ही चाचणी मशीनची बुद्धिमत्ता क्षमता ही मानवी वर्तनाच्या तुलनेत वेगळी नसते हे स्पष्ट करते. येथूनच, भविष्यातील एआय संशोधन आणि विकासाचा पाया घातला गेला. रोबोटिक्सचे भविष्य खूप महत्त्वाचे आहे, कारण ते मानवी जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि सुरक्षित बनवेल. रोबोट्स आता केवळ उत्पादनापुरते मर्यादित नाहीत, तर ते कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने अधिक स्वायत्तपणे विचार करतील, शिकतील आणि नवीन परिस्थितीशी जुळवून घेतील. यामुळे आरोग्यसेवा, शिक्षण, आपत्कालीन व्यवस्थापन आणि वाहतूक यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत. रोबोट ही अशी साधने आहेत जी स्वायत्तपणे जाणू शकतात, तर्क करू शकतात, योजना करू शकतात आणि कृती करू शकतात. स्वतंत्रपणे कामे करण्यासोबतच ते मानवी क्षमता वाढवू शकतात आणि मानवी कृतींची नक्कल करू शकतात. भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणा-या रोबोटिक्स बाजारपेठांपैकी एक आहे. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्सच्या आकडेवारीनुसार २०२१ ते २०२४ पर्यंत भारतात रोबोट स्थापनेत सुमारे ८४ टक्के वाढ झाली. वार्षिक औद्योगिक-रोबोट स्थापनेच्या बाबतीत भारत आता जगातील सहाव्या क्रमांकाचा देश आहे. २०२५ मध्ये रोबोटिक्सचे भविष्य हा सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण या क्षेत्राने सिद्धांताच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष अवलंबनात प्रवेश केला आहे. एआयच्या विस्तारामुळे एकीकडे नोक-यांवर टांगती तलवार उपस्थित झाली आहे. तर दुसरीकडे एआयच्या वाढत्या जाळ्यामुळे भविष्यात नोकरी गरजेपेक्षा छंद म्हणून केली जाईल. लोकं फक्त आवड म्हणून नोकरी करतील. हा बदल समाजाच्या रचनेत मूलभूतपणे बदल करेल आणि लोकांच्या भूमिका पूर्णपणे बदलेल. या बाबतीत जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती इलॉन मस्क यांनी धक्कादायक भविष्यवाणी करत एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सद्वारे पूर्णपणे बदललेल्या भविष्यातील जगाचे व्यापक दृष्टिकोन सादर केले. पुढच्या १०-२० वर्षात एआय आणि रोबोटिक्स इतके प्रगत होतील की जगातील बहुतेक कामं ही मशीन्स करतील. लोकं इच्छा असेल तरच काम करतील. जेव्हा मशीनच सर्व गरजा विनामूल्य किंवा अतिशय स्वस्तात पूर्ण करू लागतील, तेव्हा सध्याची चलनव्यवस्था आणि पैशाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी होईल. तुमच्या खिशातला पैसा, नोटा आणि बँक काड्र्स भविष्यात कदाचित काहीही कामाचे राहणार नाहीत. एआय आणि रोबोटिक्स झपाट्याने विकसित झाल्यास 'पैसा' हे फक्त औपचारिक साधन राहील. कारण एआय आणि रोबोटिक्स इतक्या वेगाने प्रगत होतील की, उत्पादनासाठी मानवशक्ती किंवा मोठ्या संसाधनांची गरजच उरणार नाही. वस्तूंची मुबलकता वाढली तर 'पैसा' या संकल्पनेची किंमत उरेलच असे नाही. भविष्यात ऊर्जा हीच खरी करंसी ठरू शकते. ऊर्जा ही उत्पादनाची मूळ ताकद असल्याने तिचे महत्त्व पैशापेक्षा जास्त होईल. इलॉन मस्क यांनी स्कॉटिश लेखक इयान बँक यांच्या 'कल्चर' सीरिजचा दाखला देत एका अशा समाजाचे वर्णन केले आहे की, जिथे काहीच कमी नसते आणि पैसा अस्तित्वातही राहत नाही. सोलर पावर्ड एआय आणि स्पेसमधून ऊर्जा मिळवणा-या तंत्रज्ञानामुळे भविष्यात अशी दुनिया वास्तवात उतरण्याची शक्यता व्यक्त केली. जग जसं पुढे चाललं आहे, तसं जगाचे भविष्य एआयद्वारे ठरवले जाईल आणि त्या जगात 'पैसा' नाहीसा होईल. नोक-या पर्यायी छंद बनतील म्हणजेच लोकांना जीवन जगण्यासाठी काम करण्याची आवश्यकता राहणार नाही आणि गरिबी अस्तित्वात राहणार नाही. एआय आणि ह्युमनॉइड रोबोट्समध्ये पहिल्यांदाच ख-या अर्थाने गरिबी दूर करण्याची क्षमता आहे. कारण जेव्हा ह्युमनॉइड रोबोट्स उत्पादन स्वस्त आणि जलद करतील, तेव्हा मूलभूत वस्तू इतक्या परवडणा-या होतील की आर्थिक संकट येणार नाही. तसेच लोकं कोणतेही उत्पादन आणि सेवा सहजपणे मिळवू शकतील. टेस्ला ही ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करणारी एकमेव कंपनी राहणार नाही. अनेक कंपन्या ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करतील आणि तंत्रज्ञान जगाला श्रीमंत करेल. एआय आणि रोबोटिक्स तंत्रज्ञान जगातील प्रत्येकाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. या प्रणाली विकसित होताना मानवी जीवनातील आर्थिक संघर्ष पूर्णपणे संपुष्टात येतील आणि मानवांना काम करायचे की नाही हे निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. जेव्हा रोबोट सर्व कामं हाती घेतील तेव्हा सरकारला युनिव्हर्सल हाय इन्कम प्रदान करावे लागेल, जे साध्या मूलभूत उत्पन्नापेक्षा खूप जास्त असेल. येत्या काळात हा बदल अधिकाधिक स्पष्ट होईल.

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

नाथांच्या जीवनाचा पंचपर्व साक्षीदार

(9 ते 11 मार्च: श्रीएकनाथ षष्ठी- पंचपर्वश्रेणी पैठण यात्रा विशेष.)



एकनाथ षष्ठी म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठी हा संत एकनाथ महाराजांची पुण्यतिथी आणि समाधी दिन म्हणून पैठण येथे मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जाणारा मुख्य उत्सव आहे. मार्च महिन्यात येणाऱ्या या दिनी लाखों वारकरी "भानुदास-एकनाथ" चा गजर करत नाथांच्या समाधीचे दर्शन घेतात. या दिवशी नाथ समाधीस्थ झाले, आणि हाच दिवस त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या ५ घटनांचा पंचपर्व साक्षीदार आहे.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप-
९४२३७१४८८३.

उत्सवाचा इतिहास - आजच्या फाल्गुन वद्य ६ या दिवशी पाच घटना घडल्याने त्यांना पंचपर्वश्रेणी असेही म्हणतात. नाथ स्वत: आपल्या गुरुंचा जन्मदिवस व पुण्यतिथी म्हणून यादिवशी उत्सव साजरा करीत. पुढे नाथांनीही याच दिवशी जलसमाधी घेतल्याने श्रीएकनाथषष्ठी म्हणून हा दिवस साजरा करण्यात येवू लागला. पंचपर्व असे - १) नाथांचे गुरू श्री जनार्दन स्वामी यांचा जन्म, २) स्वामींना दत्तात्रयांचे दर्शन व अनुग्रह, ३) नाथांना स्वामींचे प्रथमदर्शन व अनुग्रह, ४) श्रीजनार्दन स्वामी पुण्यतिथी आणि ५) संतश्रेष्ठ श्रीएकनाथ महाराज जलसमाधी हे आहेत. श्रीएकनाथषष्ठी हा दिवस महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर श्रीएकनाथ महाराज जलसमाधी दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. विशेषत: पैठणमध्ये सहा ते सात लाख भाविक या सोहळ्यास उपस्थित असतात. पैठण येथील नाथषष्ठीची वारी वारकरी संप्रदायातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी वारी असून पंढरपुरच्या आषाढी वारी नंतर या वारीस मोठ्या प्रमाणावर वारकरी समाज एकत्रित होतो. विविध ठिकाणांहून आलेल्या ४७५ दिंडया, "भानुदास-एकनाथ" चा गजर यामुळे संपूर्ण परिसर न्हाऊन निघतो. फाल्गून वद्य षष्ठी, सप्तमी व अष्टमी (साधारणत: मार्च महिना) या दिवसांत हा उत्सव साजरा करण्यात येतो. द्वितीयेस गावातील नाथमंदिरातील रांजणाच्या पूजेनं उत्सवाची सुरूवात होते. द्वितीया ते पंचमीपर्यन्त श्रीकेशवस्वामीकृत नाथ चरित्राचे पारायण करण्यात येते. पंचमीच्या दिवशी मानकऱ्यांना उत्सवाचे आमंत्रण दिले जाते. आज षष्ठीच्या दिवशी पहाटे २ वाजता श्रीविजयी पांडुरंगाच्या मूर्तीस महाभिषेक करण्यात येतो. नाथवंशजांची मानाची पहिली दिंडी दुपारी १२ वाजेच्या सुमारास गावातील मंदिरातून श्रीएकनाथ महाराजांच्या समाधी मंदिराकडे प्रस्थान करते. मंदिरात नाथ वंशजांच्या वतीनं वारकरी व हरिदासी कीर्तनं करण्यात येतात. गावातील मंदिरात परतल्यानंतर आरती होते. सोहळ्यासाठी आलेल्या सर्व दिंड्या नगर प्रदक्षिणा करुन गोदाकाठी आपापल्या फडात-मठात विसावतात. उद्या सप्तमीच्या दिवशी रात्री १२ वाजता नाथांच्या पादुकांची गावातून मिरवणूक काढण्यात येते. त्यास छबिना असे म्हणतात. पहाटेच्या सुमारास पालखी वाळवंटात आल्यानंतर पादुकांना गोदास्नान घालण्यात येते, भारुड सादर केली जातात. सकाळी ७ वाजेच्या सुमारास पालखी गावातील मंदिरात येते. वारकऱ्यांच्या फडांमध्ये भजन कीर्तनादींचे आयोजन करण्यात येते. वाळवंटात कीर्तन ऐकण्यासाठी भाविकांची गर्दी जमते. परवा अष्टमीच्या दिवशी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास गावातील नाथमंदिरातून काला दिंडी निघते. उदासीमठाजवळील पायऱ्यांवर पावल्या खेळण्यात येतात. हे दृश्य आपल्या डोळ्यात साठविण्यासाठी हजारोंचा समुदाय येथे उपस्थित असतो. समाधी मंदिरात पोचल्यानंतर मंदिराच्या समोरील पटांगणावर टाळमृदुंगाच्या गजरात शेकडो भाविक पावल्या खेळण्यात तल्लिन होऊन जातात. मंदिराच्या बाजूस उंच ठिकाणी गुळ आणि लाह्या यांचे मोठेमोठे लाडू आकर्षकरित्या बांधण्यात येतात. त्याच्या मध्यभागी काला भरलेली हंडी लटकविलेली असते. सूर्यास्तासमयी 'दत्तात्रय जनार्दन श्री एकनाथ' च्या जयघोषात श्रीनाथ वंशजांकडून काठीच्या सहाय्यानं ती हंडी फोडण्यात येते. प्रसाद मिळविण्यासाठी भाविकांची झुंबड उडते. परंपरेचे अभंग, गौळणी, आरती झाल्यानंतर गोदावरीच्या वाळवंटात काला वाटण्यात येतो. या तीनही दिवसांमध्ये श्रीएकनाथ महाराजांच्या पैठणकर फडातील हजारो वारकरी दिंडीत सहभागी होत असतात. शिवाय इतरही दिंड्या आपआपल्या पध्दतीनं सोहळ्याचा आनंद लुटतात. सद्यस्थितीत पैठण येथे सोहळ्यास येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खान्देश आदी ठिकाणांहून येणाऱ्या भाविकांच्या संख्येत वाढ होत आहे तसेच कोकण, मुंबई, कर्नाटक आदी परिसरातून दिंडया घेवून येण्यासाठी भाविक उत्सुक असल्याने येथे वारकऱ्यांची नव्यानेच भर पडत आहे. नाथषष्ठी हा उत्सव विदेशी लोकांच्याही आकर्षणाचा विषय बनला असुन अनेक विदेशी पर्यटक सोहळा पाहण्यासाठी पैठणास येतात, हे विशेष!!!!

श्री एकनाथ षष्ठी- पंचपर्व श्रेणी पैठण यात्रा या निमित्त समस्त भगवद्भक्त भाविकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

टगे ..

छोटी मोठी कुरबुरी
भांडू लागे लहानगे
पुन्हा होती एकरूप
कुणी सांगणे न लगे

क्रोधजपतोअंतरात
उगा आम्हीमात्र टगे
दुश्मनीतशीचं सुदृढ
अख्खे आयुष्य जगे

वाढत ठेवतो दुरावा
सातत्येअग्नी सुलगे
माझीचं दिशा योग्य
बडवतराहतो हलगे

प्रबोधन शून्य वत ते
सुधारतनाही कोडगे
वैर भाव सांभाळती
बसू दया किती बडगे

असूया स्पोटकोठारे
चिंगारी उरी धगधगे
युध्दाला जबाबदार
क्रोधज्वाळेस बिलगे

माणूसकीसहिष्णुता
केंव्हाच पडली मागे
विध्वंस अवघा होता
शांतीस्तव भीकमागे

समजावेलहानग्यांस
उलटे आपणचं वागे
उक्तीकृती भिन्नभिन्न
कसे दिसे ना वावगे

- हेमंत मुसरीफ पुणे .
9730306996

व्यसन ..

नवीन पिढी मॉडर्न
मोकळी बंधन मुक्त
सहजगत्या कसली
बनली व्यसनासक्त

पळापळा पुढे पळा
शर्यत लावली फक्त
वेळ नाही प्रबोधना
कुणीचं होईना व्यक्त

वेळ कुठे बोलायला
सगळे स्वतात व्यस्त
नाते बंधन दूर जाती
व्यसन जिगरी दोस्त

वडील मुलगा संगती
व्यसनात गुंगले मस्त
बायकाही बरोबरीने
झिंगती कसे मदमस्त

व्यसन साधने सुलभ
भाकरीपेक्षाही स्वस्त
अधःपात पहा अहा
बसतो केवळ स्वस्थ

सगळेचं करता चुका
करणारं कोण दुरुस्त
पहारा कुणाचा नको
कोण घालणारं गस्त

प्रतिष्ठा मिळे व्यसना
वाढत चालले रे प्रस्थ
मृत्यूपूर्वी मरणयातना
बाबा दूर नाही अस्त

- हेमंत मुसरीफ पुणे .
9730306996

स्त्री एक प्रेरणा

"यत्र नार्यस्तु पूज्यंते, तत्र रमन्ते देवता"असे म्हणतात की, जिथे महिलांचा सन्मान केला जातो, तिथे स्वयं देवांचा वास असतो.प्रथमतः सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा. महिलांना स्वतंत्र मिळवून देण्याचे धाडस पुरुषवर्गाने अत्यंत सहज सोपे केले. तिला सर्व क्षेत्रात आघाडीवर ठेवले. व्यवसाय, राजकारण, घरातील स्वतंत्र, नोकरी या सारख्या गोष्टीत आपला महिला वर्ग अतिशय उत्तम रित्या यशस्वी आहे. याचा नक्कीच अभिमान राहील. परंतु, सध्याच्या घडामोडी पाहता जास्तच स्वतंत्र प्राप्त झाले आहे असे वाटते. इंटरनेट चे जाळे आणि सोशल मीडिया च्या दिखाऊ दुनियेतकाही महिला संस्कृती पासून, घर _नाते संबंधापासून, मुलांपासून भरकटत जाताना दिसत आहे. तर काही अपडेटेड महिला सोशल मीडिया चा योग्य वापर करून आपली ओळख निर्माण करत आहेत. महिलांनो, मुलीनों धावपळीच्या युगात तुम्ही स्वतःला वेळ द्या, मुलांना योग्य संस्कार, मार्गदर्शन द्या, स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या, हेल्थ चेकअप करा, तुमची अर्धवट राहिलेली स्वप्ने जपा, आणि काही महिलांच्या डिग्री जर इन्कम्प्लिट असतील तर त्या पूर्ण करा. तुमच्या पंखाना बळ देऊन ऊंच भरारी नक्की घ्या. आणि व्यसनाधीन कुटुंबाला नक्कीच हिमतीने बाहेर काढा. नारी खूप सशक्त असते, आता बघा ना! स्त्री पुरुषासाठी व्रत/उपवास ठेवू शकते, पण स्त्री साठी अजून एकपण असा उपवास/व्रत नाही, कारण स्त्री ला घडविताना देवाने एक सशक्त, प्रबळ इच्छाशक्ती असणारी देवी म्हणूनच घडविले आहे. "जिचं संपूर्ण आयुष्यच अडचणीने भरलेलं आणि प्रेरणेने रेखाटलेले आहे, अशी बहुमूल्य शक्ती म्हणजेच स्त्री."स्वतःचा सन्मान करा, योग्य मार्ग वापरून आजकाल ची मुले _मुली घडवा कारण त्या पिढीतच उद्याची "जिजाऊच्या लेकी"आणि "शिवबाचे मावळे" म्हणून घडतील. महिला दिवस हा आज पुरताच नाही,कारण बाईचं अस्तित्व प्रत्येक दिवशीच खास असतं. पुन्हा एकदा माझ्या सर्व प्रिय मैत्रिणींना उमलून येण्यासाठी, आनंदी जीवन नवीन उमेदीने जगण्यासाठी, क्रांती घडविण्यासाठी बळ मिळो आणि "जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!"

सौ. रचनाताई अतुल नहार . वडवणी बीड

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) **RNI NO : MAHMAR/2022/82242**

‘व्हॉईस ऑफ मीडिया’चे पॉझिटिव्ह जर्नालिझम पुरस्कार जाहीर

कुणाल लाडे, संदेश साळुंके,शाहिद पठाण, रुपेश बागड,राहुल पवार,स्वप्निल कांबळे, ईश्वर महाजन,महेंद्रसिंग गिरासे,भारत सवणे,विनोद कांबळे,लियाकत पठाण,सारिका शिंदे,संदीप पिंपळकर,महेश जगताप,मल्हारी ओमासे पुरस्काराचे मानकरी १५ मार्चला राज्यपालांच्या हस्ते पुरस्काराचे वितरणमुंबई: पत्रकारांची देशातील सर्वात मोठी संघटना असलेल्या ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ ‘व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम’ च्या वतीने दिले जाणारे राज्यस्तरीय ‘पॉझिटिव्ह जर्नालिझम पुरस्कार’ आज जाहीर करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के पाटील, संचालक तथा संयोजक गोरक्षनाथ मदने आणि राज्य उपाध्यक्ष अजितदादा कुंकूलोळ यांनी आज या पुरस्कारांची अधिकृत घोषणा केली. सकारात्मक पत्रकारितेचा जागर व्हावा आणि समाजात क्रांती घडवून आणणाऱ्या बातम्यांना बळ मिळावे, या उद्देशाने गेल्या पाच वर्षांपासून या पुरस्कारांचे आयोजन करण्यात येते. राज्य शासन आणि ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ ‘व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम’च्या वतीने हा पुरस्कार दिला जातो. येत्या १५ मार्च रोजी राजस्थानचे राज्यपाल



हरिभाऊ बागडे, राज्याचे मंत्री मंगलप्रसाद लोढा आणि अमृता फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते वाय बी चव्हाण येथे सायंकाळी ५ वाजता या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावर्षी या पुरस्कारांसाठी राज्यभरातून तब्बल ६०० प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यामधून प्रत्येक विभागातील एका जिल्हा आणि एका तालुका स्तरावरील एकूण १५ पत्रकाराची निवड करण्यात आली आहे.पुरस्कार विजेत्यांमध्ये कोकण विभागातून कुणाल लाडे (डहाणू) व संदेश साळुंखे (रायगड), विदर्भ विभागातून शाहिद पठाण (गोंदिया) व रुपेश बाजड (वाशिम), पश्चिम महाराष्ट्रातून राहुल पवार (कराड) व स्वप्निल कांबळे (राधानगरी), उत्तर महाराष्ट्रातून ईश्वर महाजन (अमळनेर) व महेंद्रसिंग गिरासे (शिंदखेडा) आणि मराठवाडा विभागातून भारत सवणे (परतूर) व विनोद कांबळे (लातूर) यांचा समावेश आहे.विशेष विंग अंतर्गत उर्दू विंगसाठी लियाकत पठाण (नाशिक), महिला विंगसाठी सारिका शिंदे (ठाणे), साप्ताहिक विंगसाठी संदीप पिंपळकर (वाशिम), रेडिओ विंगसाठी महेश जगताप (पुणे) आणि डिजिटल विंगसाठी मल्हारी ओमासे (सांगली) यांची निवड करण्यात आली आहे.या पुरस्कारासाठी १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत किमान ४२ किंवा त्यापेक्षा अधिक थेट परिणामकारक बातम्या व लेख प्रसिद्ध असणे अनिवार्य होते. संघटनेचे मुख्य पदाधिकारी संजय आवटे, चंद्रमोहन पुपाला, शंतनू डोईफोडे आणि दिव्या भोसले, ऍड विवेक खरे यांनी निवड समितीचे प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली. ७८ देशांत ४ लाख ७० हजारांहून अधिक सदस्य असलेल्या ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ने पत्रकारांच्या कल्याणासोबतच सकारात्मक पत्रकारितेसाठी मोठे पाऊल उचलले आहे. पत्रकारितेकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलावा आणि सामाजिक जागृती व्हावी, याच भावनेतून हे पुरस्कार दिले जात असल्याचे संयोजकांनी स्पष्ट केले.

जागतिक महिला दिनानिमित्त मनोगत कट्ट्यामध्ये प्रकाशन

परभणी ,अरविंद कांबळे पूर्णा :



श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय पूर्णा येथे जागतिक महिला दिनानिमित्त समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित मनोगत कट्टा अंतर्गत प्रकाशन प्राचार्य डॉ.के. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनाला प्रभावित करणाऱ्या महिला संदर्भात उत्कृष्ट लिखाण प्रकाशित केले.यात विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवलासमाजशास्त्र विभागातील डॉ. अंबिका चोंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना म्हटले की, प्रत्येक महिन्यात वेगवेगळ्या विषयावर मनोगत कट्ट्यामध्ये आपले मत मांडण्यासाठी हे सदर उपलब्ध करून देण्यात आले आहे , विद्यार्थ्यांच्या ज्ञानासाठी आणि त्यांच्या अभिव्यक्तीसाठी महत्त्वाची भूमिका मनोगत कट्टा घेत आहे. त्यासाठी हा उपक्रम अतिशय प्रभावी ठरत आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक महिन्यातील उत्कृष्ट लेखनासाठी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे वितरण आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने प्राचार्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भूमिका जांगिड, भूमिका चावरे, प्रीती केशरखाने विशाल अडवाल, प्राची बुद्धे, मयुरी सोलव या विद्यार्थ्यांना त्यांच्या लेखनासाठी सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ गजानन कुरुंदकर, डॉ शिवसांब कापसे, प्रा बाहेतीसर, डॉ. विजय पवार, डॉ. वृषाली आंबेडकर, डॉ संदीप शिंदे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घनश्याम कदम यांनी केले तर आभार कु. रोशनी कापुरे यांनी मानले

मानवी हक्क अभियान या सामाजिक संघटनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी विष्णू मुजमुले यांची निवड

विचारातूनच नवीन परिवर्तन आणि समाजाला नवी दिशा दाखविणार व जोपासणार असल्याची दिली ग्वाही

वडवणी प्रतिनिधि:–

मानवी हक्क अभियान या सामाजिक संघटनेची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य विष्णू मुजमुले यांनी अखंडितपणे सुरू ठेवले. या कामाची दखल घेऊनच त्यांची बीड जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड केली आहे या निवडीमुळे या संघटनेच्या कार्याला अधिक बळकटी मिळणार असून या निवडीबद्दल विष्णू मुजमुले यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, स्व. एकनाथरावजी आवाड यांच्या विचारातून मानवी हक्क अभियान या सामाजिक संघटनेची उभारणी झाली आहे. या संघटनेने केंडर कॅम्प च्या माध्यमातून सक्रिय कार्यकर्ता घडवण्याचे पवित्र असे काम केले आहे. बहुजन समाजावर जेथे कुठे अन्याय झाला, तेथे जाऊन त्याविरुद्ध आवाज



उठवण्याचे देखील कार्य या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून केले व होत आहे. या सामाजिक संघटनेमध्ये कार्य करणारे तरुण अनेक मोठ्या पदावर सुद्धा आहे. स्व. एकनाथ आव्हाड यांच्यानंतर आता त्यांचे वारसदार प्रा. मिलिंद आवाड ही या सामाजिक संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची धुरा सांभाळत आहे . या सामाजिक संघटनेच्या उभारणीपासून ते आज तगायात पर्यंत विष्णू मुजमुले एकनिष्ठ राहिलेले आहेत. त्यांना मागील काळात वडवणी तालुकाध्यक्ष पदाची धुरा देण्यात आली होती. त्यांनी ती सक्षमपणे पेलावली म्हणूनच मानवी हक्क अभियानाचे संस्थापकीय राष्ट्रीय अध्यक्ष स्व. अँड. एकनाथरावजी आवाड साहेब यांच्या आशीर्वादाने व प्रा. मिलिंद आवाड यांच्या आदेशाने बीड जिल्हाध्यक्षपदी विष्णू मुजमुले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे तर ही जबाबदारी दिल्यानंतर विष्णू मोजमले म्हणाले की संघटनेच्या विचारातूनच सामाजिक परिवर्तन शक्य होईल आणि त्यातूनच बहुजन समाजाला नवीन दिशा देण्याचं कार्य करत त्याची जोपासना केली जाईल अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली आहे. या निवडीप्रसंगी मानवी हक्क अभियान या संघटनेच्या मातोश्री गयाबाई (जिजी) आवाड, प्रदेशाध्यक्ष मच्छिंद्र गवाले, मराठवाडाध्यक्ष रघुनाथ कसबे, महाराष्ट्र राज्य संघटक आनंद साळुंखे यांच्यासह संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती

नागवंशी बुद्ध विहार येथे भारतीय बौद्ध महासभा शाखा वडवणीच्या वतीने श्रामनेर शिबिराला दमदार सुरुवात नागवंशी बुद्ध विहार येथे भारतीय बौद्ध महासभा शाखा वडवणीच्या वतीने श्रामनेर शिबिराला दमदार सुरुवात

वडवणी –प्रतिनिधी,



अखंड जगाला शांतीचा समतेचा व बंधुत्वाचा संदेश देणारे तथागत महाकारूणी भगवान गौतम बुद्ध यांच्या विचाराची कार्याची व धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आयोजित भारतीय बौद्ध महासभा वडवणी तालुका शाखेच्या वतीने वडवणी शहरातील नागवंशी बुद्ध विहार येथे श्रामनेर शिबिराला दमदार सुरुवात झाल्याची माहिती आयोजक प्रा प्रकाश खळगे सर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे. सविस्तर वृत्त असे की वडवणी तालुक्यामध्ये मौजे पिंपरखेड येथे चार धम्म परिषदाचे आयोजन प्राध्यापक प्रकाश खडके सर यांनी केले होते यावर्षी पाचव्या बौद्ध धम्म परिषदेला भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू सन्माननीय भीमराव यशवंतराव आंबेडकर हे 14 मार्चला वडवणी शहरात येत असून या पाचव्या बौद्ध धम्म परिषदेला मार्गदर्शन करणार आहेत. गेल्या अनेक वर्षापासूनचा फडके सरांचा संकल्प यावर्षी पूर्णत्वाकडे जात आहे याचा आनंद खळगे सर यांच्यासह तालुक्यातील व जिल्ह्यातील समाज बांधवांना व बहुजन समाजातील मान्यवरांना होत आहे. त्याच अनुषंगाने पाच तीन 2026 पासून या श्रामनेर शिबिराला सुरुवात झालेली आहे याची सांगता 14 मार्च रोजी डॉक्टर भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागवंशी बौद्ध विहार येथे संपन्न होणार आहे तरी तालुक्यासह जिल्हा भरामधून बहुजनांनी या ऐतिहासिक बौद्ध धम्म परिषदेचा लाभ घ्यावा असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा व नागवंशी बुद्ध विहार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

लेंगरे मंडळ येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ उत्साहात संपन्न

(प्रदीप जोशी, विटे प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान – टप्पा १’ अंतर्गत दिनांक ७ मार्च २०२५ रोजी लेंगरे मंडळ, तालुका खानापूर (विटा) येथे समाधान शिबिर उत्साहात व नागरिकांच्या मोठ्या प्रतिसादात पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून महसूल व इतर शासकीय विभागांच्या विविध सेवा व योजनांचा लाभ नागरिकांना मंडळ स्तरावर थेट उपलब्ध करून देण्यात आला.या शिबिरास खानापूर मतदारसंघाचे आमदार मा. सुहास अनिलराव बाबर, उपविभागीय अधिकारी विक्रम बांदल, तहसीलदार योगेश्वर टोंपे, गट विकास अधिकारी डॉ. संताजी पाटील, जिल्हा परिषद सदस्या शीतल अमोल बाबर, मनिषाताई बागल, पंचायत समिती सदस्य पायल निवास कदम, तसेच तालुका आरोग्य अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी, लेंगरे मंडळातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना त्यांच्या गावाजवळ उपलब्ध करून देणे, महसूल व इतर शासकीय कामकाजातील प्रलंबित प्रश्न सोडविणे, तसेच बिनशेती विषयक निर्णय, तुकडेबंदी अधिनियम आणि विविध शासकीय योजनांबाबत जनजागृती करणे हे होते. शासनाच्या सेवा अधिक लोकाभिमुख व गतिमान करण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तहसीलदार योगेश्वर टोंपे यांनी दिली.या समाधान शिबिरामध्ये ५०० हून अधिक लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यात आला, तर ८०० पेक्षा अधिक नागरिकांना शिबिरस्थळीच विविध शासकीय सेवा पुरविण्यात आल्या. महसूल विभागामार्फत १५० नागरिकांना महसुली सेवांचा लाभ देण्यात आला. तसेच संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत १९ लाभार्थ्यांना मंजुरी, तर ९४ कुटुंबांना नव्याने धान्य पुरवठा सुरू करण्याबाबत आदेश देण्यात आले. तसेच ६ बचतगटाना ३० लाख रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले. ४७ नागरिकांनी आधार कार्ड दुरुस्ती करून घेतली.. याशिवाय सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी, वारस नोंदी, तुकडेबंदी अधिनियम नोंदी, विविध दाखले वितरण, शालेय दाखले, रेशन कार्ड संदर्भातील सेवा तसेच सामाजिक सहाय्य योजनांचे लाभ नागरिकांना देण्यात आले. शिबिरामध्ये एकूण ७५ विविध प्रकारचे दाखले नागरिकांना वितरित करण्यात आले.लेंगरे मंडळातील जोंधळखिंडी येथील बेलदार समाजातील काही नागरिकांना महसुली पुराव्यांच्या अभावामुळे स्वातंत्र्यानंतरही जातीचे दाखले मिळाले नव्हते. या शिबिराच्या निमित्ताने मंडळ अधिकारी यांच्या चौकशी अहवालाच्या आधारे त्यांना जात दाखले वितरित करण्यात आले, ही या शिबिराची विशेष बाब ठरली.तालुका स्तरावरील विविध विभागांनी आपल्या योजनांची माहिती देण्यासाठी माहितीपर स्टॉल उभारले होते. या स्टॉलवर नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच अनेक अर्ज जागेवरच स्वीकारण्यात आले, त्यामुळे नागरिकांना शासनाच्या विविध सेवांचा लाभ एकाच ठिकाणी मिळाला.आरोग्य विभागामार्फत १०० नागरिकांना आयुष्मान भारत गोल्डन कार्डचे वितरण करण्यात आले तसेच ६८ नागरिकांची रक्तदाब (BP) व हिमोग्लोबिन (HB) तपासणी करण्यात आली. महिला व बाल विकास विभागामार्फत ४ गरोदर व स्तनदा मातांना ‘बेबी केअर किट’चे वितरण करण्यात आले.या समाधान शिबिरामुळे नागरिकांची अनेक प्रलंबित कामे तातडीने मार्गी लागली असून शासनाच्या सेवा थेट जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्दिष्टाला मोठे यश मिळाले, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज तर्फे सामुदायिक आरोग्य उपक्रम

प्रतिनिधी (कांताभाऊ राठोड)



शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज यांच्या वतीने सिद्धार्थ ऑटो इंजिनियर्स प्रा. लि., पुणे यांच्या सीएसआर निधीतून एक महत्त्वपूर्ण सामाजिक आरोग्य प्रकल्प राबविण्यात आला. हा उपक्रम कोंढवा येथील बाळासाहेब देवरस पॉलीक्लिनिक येथे पार पडला.या प्रकल्पांतर्गत मधुमेही रुग्णांच्या पायांची सर्वसमावेशक तपासणी व प्रतिबंधात्मक निदानासाठी तीन अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे पॉलीक्लिनिकला प्रदान करण्यात आली. यामध्ये पायाचा दाब व चालण्याची पद्धत मोजणारी यंत्रणा, टच-प्रो नर्व्ह डॅमेज असेसमेंट उपकरण तसेच ऑटोमॅटिक एबीआय रक्ताभिसरण तपासणी यंत्र यांचा समावेश आहे.या सुविधेमुळे पॉलीक्लिनिकमध्ये येणाऱ्या दीर्घकालीन मधुमेही रुग्णांना सवलतीच्या दरात आवश्यक तपासण्या करून सविस्तर वैद्यकीय अहवाल उपलब्ध होणार असून, मधुमेही पायाच्या गुंतागुंतीचे लवकर निदान व प्रतिबंध करण्यास मदत होईल.डॉ. नितीन झोडगे तसेच पॉलीक्लिनिकचे उपाध्यक्ष डॉ. प्रकाश धोका यांनी या प्रकल्पाचे वैद्यकीय महत्त्व स्पष्ट केले. रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. अजय काळे, पीडीजी रो. पंकज शहा, सीएसआर देणगीदार रो. दिलीप पंडित तसेच उपस्थित रोटरी सदस्यांनी हा उपक्रम समाजोपयोगी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

माऊली कृपा वि. कार्य. सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी वसंत भागवत उपाध्यक्षपदी सौ. सुनीताताई पडवळ

(कैलास गायकवाड) लोणी प्रतिनिधी

खडकवाडी ता. आंबेगाव येथील माऊली कृपा विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी वसंतराव नानाभाऊ भागवत तर उपाध्यक्षपदी सुनिताताई आबाजी पडवळ यांची बिनविरोध निवड झाली तालुक्याच्या पूर्व भागातली एक नावाजलेली संस्था असून, संस्थेचे सभासद संख्या ७५५ आहे. भाग भांडवल रुपये ३७ लाख ९४ हजार ८२आहे. साधारणपणे गुंतवणूक ४७ लाख रुपये आहे. सभासदांना एक कोटी ९६ लाख ७० हजार कर्ज वाटप केले आहे. एकूण उत्पन्न ३०लाख ७० हजार आहे.





५६००० हजर आहे.१३टक्के लाभांश वाटलेला आहे. सदर निवडीच्या वेळेस ज्येष्ठ संचालक नाथा आबाजी सुक्रे , संतोष रामभाऊ सुक्रे, सखाराम लक्ष्मण धुमाळ, निवृत्ती नामदेव वाळुंज पांडुरंग नामदेव सुक्रे, शिवाजी शंकर वाळुंज, नितीन अर्जुन डोके, बबन भिवाजी पंचरास, ज्ञानेश्वर शंकर सुक्रे, नाथा मारुती धुमाळ, सर्व संचालक हजार होते सचिव सुरेश सुक्रे त्यांनी निवडणुकीचे काम पाहिले. दिवंगत संचालिका उज्वला नामदेव सुक्रे यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. वसंतराव भागवतांच्या निवडीमुळे संस्थेच्या माध्यमातून विविध विकास योजना राबविण्यात येतील असे ज्येष्ठ संचालक नाथा आबाजी सुक्रे यांनी सांगितले. तर नवनिर्वाचित अध्यक्ष वसंतराव भागवत यांच्या निवडीमुळे तरुण नेतृत्वाला संधी मिळाली असेच सांगितले व माजी सरपंच अनिल डोके यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

स्मशाभूमीकडे दोन्ही गटाचे दुर्लक्ष

विटे, (प्रतिनिधी) : निवडणुकीपूर्वी व निवडणुकी नंतर शहरातील स्मशान भूमीचा प्रश्न आजही दुर्लक्षित आहे. ज्यांनी इतकी वर्षे सत्ता भोगली किंवा आज जे सत्तेत आहेत. तेच स्मशानभूमी अध्ययावत करण्याची मागणी करत आहेत. विटा कराड रोड स्मशानभुमीसमोरचा रस्ता उंच झाल्यामुळे प्रवेशद्वार तिव्र उतारामुळे खचलेले आहे.नागरीकांना व



विशेषतः वयोवृद्ध लोकांना जाणे येणे कठिण झाले आहे.प्रशासनास यापूर्वी अनेक वेळा याबाबत कळवले आहे.कृपया या छोट्याश्या पण महत्वाच्या कामाची तातडीने दखल घेण्याची गरज आहे. पालिका निवडणुका होताच काही सेवाज्येष्ठ नागरिक नवरसेवक विनोद गुळवणी यांना भेटले. त्यांच्या निदर्शनास स्मशान भूमीची वस्तुस्थिती आणली. त्यांनी देखील तातडीने मुख्याधिकारी यांना फोन करून रस्ता सुस्थितीत करण्याची मागणी केली. आता विरोधी गटातर्फे किरण तारळेकर यांनी तीच मागणी केली आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की सत्तारूढ व विरोधी गटाचे नगरसेवक नाममात्र आहेत. लोकांनी दाद कोठे मागायची हाच खरा प्रश्न आहे.

जिल्हा परिषद मोर्वे शाळेत बालआनंद मेळावा उत्साहात संपन्न

खंडाळा प्रतिनिधी

गणेश गुरव खंडाळा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोर्वे या ठिकाणी अनोख्या पद्धतीने अहिरे केंद्राचा बाल आनंद मेळावा अतिशय उत्साहात संपन्न झाला . सकाळी सर्व पाहुण्यांचे पदाधिकाऱ्यांचे शिक्षक व विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत करण्यात आले . प्रवेशद्वारापाशी काढलेल्या आकर्षक रांगोळी व सेल्फी पॉईंटने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते . नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य श्री संतोष वीर ,सौ वंदनाताई धायगुडे व श्री अतुल बाबा पवार व मोर्वे गावचे प्रशासकीय सरपंच माननीय श्री अंकुश पडळकर व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माननीय श्री राहुल धायगुडे सर्व सदस्य व मोर्वे ग्रामस्थ, अहिरे केंद्रप्रमुख श्रीरंग जाधव, मोर्वे शाळा मुख्याध्यापक सौ दिपाली जाधव या सर्वांच्या शुभहस्ते कला कार्यानुभव रांगोळी दालन, चेहरा रंगवणे दालन या सर्वांचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सरस्वती पूजन करून बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले प्रास्ताविक अहिरे केंद्रप्रमुख माननीय श्री श्रीरंग जाधव यांनी केले . त्यानंतर माननीय श्री अतुल बाबा पवार शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष माननीय श्री राहुल धायगुडे व शिक्षण विस्तार अधिकारी माननीय सौ उर्मिला पवार मॅडम यांनी मनोगते व्यक्त केली व कार्यक्रमास शुभेच्छा



दिल्या तसेच बी .आर . सी . मधील विषयतज सौ . वनिता घाडगे मॅडम ही उपस्थित होत्या . त्यानंतर फनी गेम्स झाल्यानंतर दुपारी सर्व विद्यार्थी व शिक्षकांना जेवण देण्यात आले . माननीय श्री संतोष साळुंखे जि .प .सदस्य सातारा व माननीय श्री . यशवंत खुंटे सदस्य प . स .खंडाळा यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली आणि मग दुपारी केंद्रातील सर्व शाळांनी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थित लोकांची मने जिंकून घेतली . श्री . हनुमंतराव धायगुडे शिविअ लोणंद उपस्थित होते .सातारा जिल्हा प्राथ. शिक्षक संघटना अध्यक्ष मा . श्री चंद्रकांत यादव व खंडाळा तालुका प्राथ. शिक्षक संघटना अध्यक्ष मा . श्री . भानुदास राऊत यांनी शुभेच्छा दिल्या .अतिशय सूक्ष्म नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक सौ . दिपाली जाधव मॅडम श्री .तुषार कांबळे सर श्री . गणेश माळी सर संगीता माळी मॅडम यांनी परिश्रम घेतले . व त्यांना गावचे प्रशासकीय सरपंच व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य ग्रामस्थ यांनी चांगले सहकार्य केले.या कार्यक्रमास अहिरे केंद्रातील नियोजन केल्या प्रमाणे सर्व शिक्षकांनी चांगले सहकार्य केले . श्री . दशरथ ननावरे श्री . प्रभाकर सोळसकर श्री . दत्तात्रय धायगुडे श्री . सत्यवान माळी श्री सचिन राऊत श्री . ज्ञानेश्वर धायगुडे सौ .राजश्री पीठे, सौ रोहिणी माळी सौ .राजश्री कांबळे, सौ स्वप्नाली शेडगे या सर्वांचे सहकार्य लाभले.शेवटी हा बाल आनंद मेळावा अतिशय चांगल्या पद्धतीने पार पाडल्याबद्दल केंद्रातील सर्व शिक्षकांचे केंद्रप्रमुख श्रीरंग जाधव यांनी आभार मानले.

महिला दिन स्वराज्य कामगार संघटनेकडून साजरा !

सातारा : डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सांस्कृतिक सभागृहात स्वराज्य कामगार संघटनेच्यावतीने महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून पालिकेचे येथील सभापती धनंजय जांभळे यांच्या हस्ते महिलांचा जाहीर सत्कार करण्यात आला.जिल्हा समन्वय सौ. राजश्री चिंचकर यांनी मार्गदर्शन केले.मिलिंद पवार यांनी सूत्रसंचालन केले.सदरच्या कार्यक्रमास कपिल मट्टू,रविंद्र धडचिरे,शशिकांत कांबळे, किरण गाडे,अमोल कांबळे, सुरेश चिंचकर,गुरू आडागळे, अनिल वीर आदी पत्रकार, कार्यकर्ते, मान्यवर व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



महिलांचा सत्कार करताना धनंजय जांभळे शेजारी मान्यवर.

डॉ. चंद्रकांत पाटील यांना गौरवगाथा पुरस्काराने सन्मानित

पुणे प्रतिनिधी/शकील मनियार

सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटी लि. मुंबई या पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत बाजीराव पाटील यांना शिक्षण आणि सहकार श्रेत्रात उल्लेखनिय कामगिरी बद्दल सकाळ तर्फे गौरवगाथा या उल्लेखनिय व्यक्तिमत्त्वांच्या कार्यांचा गौरव या उद्देशाने हा कार्यक्रम पुणे येथे आयोजित केला होता.पुरस्कार प्राप्त व्यक्तीच्या कार्याचा लेख गौरवगाथा या पुस्तिकेमध्ये सादर करण्यात आला असून जेष्ठ अभिनेते डॉ. गिरीश ओक यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. सकाळ न्यूज पेपरचे मुख्य संपादक नीलेश खरे आणि डॉ.गिरीश ओक यांनी डॉक्टर चंद्रकांत पाटील यांना गौरवगाथा पुस्तिका देऊन सन्मानित करण्यात आले.शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची आधारवड ठरलेली सेकंडरी पतसंस्थेला उज्वल भविष्याकडे घेवून जाण्यासाठी संचालक, सचिव, खजिनदार ते अध्यक्ष



अशा विविध पदांवर काम करत डॉ. चंद्रकांत पाटील यांनी सहकारातून परिवर्तन घडविण्याचे काम केले.पतसंस्थेच्या माध्यमातून सुवर्णमहोत्सवी वर्षात विविध स्पर्धा घेऊन बक्षिस दिले.सभासद शाळेला भिंतीवरील घड्याळ व व्यक्तीगत बक्षिस वितरण करण्यात आले. पतसंस्थेने सुवर्णमोहत्सवी वर्षी दादर येथे सेकंडरी भवन खरेदी केले. महाबळेश्वर येथे सहकार भवन उभारण्याचा संस्थेचा मानस असून सभासदांसाठी पर्यटन व मेडीक्लेम योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी नंतर ग्राहक भांडार सुरु करण्याचा मानस आहे. बावधन पुणे येथे झालेल्या या कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे, खजिनदार सतेश शिंदे, तज्ञ संचालक गुलाबराव गवळे,जगन्नाथ जाधव,संचालक पांडुरंग कणसे,प्राचार्य तुकाराम बेनके, कुंडलिक मेमाणे, देविदास कंठाळे,प्रमोल कुसेकर इ.मान्यवर सेकंडरी पतसंस्थेच्या वतीने उपस्थित होते.

सभासदांना स्वतःचे घर घेण्याचे ,मुलांच्या उच्च शिक्षणाचे स्वप्न साकारण्यासाठी तसेच आरोग्यविषयक गरजांसाठी संस्था अर्थसाहाय्य करते.त्यामुळे संस्था सभासदांचा भक्कम आधार ठरली.विविध ठेव आणि कर्ज योजनांमुळे सभासदांचे जीवनमान उंचवण्यास मदत झाली याचा मला मनस्वी आनंद आहे. डॉ. चंद्रकांत पाटील (अध्यक्ष सेकंडरी पतसंस्था लि. मुंबई)

रात्रभराच्या एका कृत्याने उद्ध्वस्त झाले स्वप्न दोडक्याचा बहरलेला मंडप पाडला; शेतकरी नागवडे यांच्या डोळ्यात अश्रू"

रांजणगाव गणपती प्रतिनिधी :

बाळासाहेब कुंभारशेतकरी म्हणजे मातीशी नाळ जोडलेला माणूस. उन्हातान्हात घाम गाळून तो आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी अन्न उगवतो. पण कधी कधी काही लोकांच्या अमानुष कृत्यामुळे त्या मेहनतीचे मोल क्षणात शून्य होते. अशीच हृदय पिळवटून टाकणारी घटना शिरूर तालुक्यातील बाभुळसर बुद्रुक येथे घडली असून एका शेतकऱ्याचे कष्ट एका रात्रीत उद्ध्वस्त झाले आहेत.येथील शेतकरी बबन दगडू नागवडे यांनी आपल्या शेतात प्रचंड मेहनत घेऊन दोडक्याचा प्लॉट तयार केला होता. दोडक्याच्या वेलींना आधार मिळावा म्हणून त्यांनी तारांचा मजबूत मंडप उभारला होता. दिवस-रात्र कष्ट करून, पाणी घालून, काळजीपूर्वक जपलेल्या त्या वेलींवर आता बहर येऊ लागला होता. हिरव्या गर्द पानांमध्ये लटकलेले दोडके पाहून नागवडे यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते. त्या पिकातून घराचा खर्च भागेल, कर्जाची थोडी परतफेड होईल अशी आशा त्यांनी मनाशी बांधली होती.मात्र, नियतीने



वेगळेच चित्र दाखवले.रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने पकडीच्या साहाय्याने मंडपाच्या ताराच तोडल्या. तार तुटताच संपूर्ण मंडप कोसळला आणि त्यावर वाढलेले दोडक्याचे पीक जमिनीवर पडून चिरडले गेले. सकाळी शेतात आलेल्या नागवडे यांना समोर दिसलेले दृश्य पाहून ते काही क्षण स्तब्धच झाले.कालपर्यंत हिरवाईने नटलेला मंडप आज जमिनीवर कोसळलेला...कष्टाने वाढवलेली वेल तुटलेली...आणि बहरलेले दोडके मातीमध्ये लोळत पडलेले...हे दृश्य पाहून बबन नागवडे यांच्या डोळ्यात नकळत अश्रू तरळले. "इतक्या मेहनतीने उभं केलेलं पीक कोणीतरी एका रात्रीत संपवलं... आम्ही कोणाचं काय बिघडलं होतं?" असा हळवा सवाल त्यांच्या ओठांवर उमटत होता.घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी शेतात धाव घेतली. पंचनामा करण्यात आला. यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष अरुण दादा नागवडे, कृष्णाजी नागवडे, संजय नागवडे, बबन नागवडे (शेतकरी), बापू एकनाथ नागवडे, कैलास कांबळे, राहुल नागवडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.या अमानुष कृत्याचा ग्रामस्थांनी तीव्र निषेध व्यक्त केला असून संबंधित अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे.दरम्यान, या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कारण एक प्रश्न सर्वांच्या मनात घोंगावत आहे —"जमिनीवर घाम गाळून अन्न पिकवणाऱ्या शेतकऱ्याच्या कष्टांवर कुणी असा घाव का घालतो?"एक रात्रीचा हा प्रकार फक्त एक पीक नाही, तर एका शेतकऱ्याचे स्वप्न, आशा आणि कष्ट मातीमोल करून गेला, अशी हळहळ गावकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

कवठे येथे तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी

कवठे यमाई प्रतिनिधी/ धनंजय साळवेकवठे येमाई ता. ०७ :

शिरूर तालुक्यातील पश्चिम भागातील कवठे येमाई येथे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल कवठे व समस्त ग्रामस्थांच्या वतीने तिथीनुसार शिवजयंती मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरी करण्यात आली. या राजेशाही सोहळ्यात लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शिवजयंतीच्या आदल्या दिवशी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी शिवनेरी किल्ल्याकडे प्रस्थान केले. दुसऱ्या दिवशी गावात शिवज्योत मोठ्या उत्साहात आणण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते शिवज्योत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी शिवआरती घेण्यात आली तसेच मूर्तीला अभिषेक करून शिवरायांचा पाळणा घेण्यात आला.सकाळी शिवजयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक तरुणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. प्रत्येक रक्तदात्यास प्रमाणपत्र व ट्रॅकसूट देऊन सन्मानित करण्यात आले.सायंकाळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान स्मरणार्थ पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. सुरुवातीला शिवआरती घेण्यात आली व त्यानंतर भव्य मिरवणुकीला प्रारंभ झाला.या कार्यक्रमाला पुणे जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पोपटराव गावडे, शिरूर पंचायत समिती सदस्या कांचन राजेंद्र सांडभोर, शिव सह्याद्री डेअरीचे चेअरमन सुनील वागदरे, युवा नेते अभिजीत सांडभोर, नवाशेठ वागदरे, महाराष्ट्र पोलीस निखिल गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी राजेंद्र गावडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, हिंदुत्वाचे रक्षण राजे शिवछत्रपतींनी केले असून स्फूर्तीस्थाने टिकवणे व संस्कृती वाढवणे हे कार्य विश्व हिंदू परिषद व बजरंग दल करत आहेत.मिरवणुकीदरम्यान चित्तथरारक शिवतांडव अघोरी शोने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. पीर साहेब मित्रमंडळाने 'छावा'चा जिवंत देखावा सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. नवज्योत मित्र मंडळाच्या ढोल पथकाने दमदार वादन करून वातावरण दणाणून सोडले. तसेच सह्याद्री मर्दानी आखाड्याच्या कलाकारांनी शिवकालीन मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाच्या शेवटी शिववंदना व आरती घेण्यात आली. त्यानंतर उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयाचे पाटणसावंगी येथे रासेयो शिबीर

पाटणसांवगी(दिलीप येवले):–
नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयातील विशेष शिबीर योजना कार्यक्रमाच्या अंतर्गत बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा येथील रा.से.योजना अंतर्गत ' युथ फॉर डिजिटल लिटरसी ' या संकल्पनेवर आधारित पाटणसावंगी येथे गुरुवार दिनांक १९/२/२६ ते बुधवार दिनांक २५/२/२६ पर्यंत सात दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. १९/२/२६ रोजी शिबीरार्थी विद्यार्थ्यांचे आगमन पाटणसावंगी येथे झाले. या शिबीराचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री सुनिलबाबू केदार होते. दिनांक २०/२/२६ रोजी त्यांच्या अध्यक्षतेखाली पाटणसावंगी येथील सरपंच रोशनीताई ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. पूर्णिमाताई केदार चिंचमलातपुरे(विश्वस्त बॅरि. शेषराव वानखेडे 56 वा वाढदिवस प्रतिष्ठान ,नागपूर) मुक्ताताई कोक्कडे (माजी अध्यक्ष जी. प. नागपूर) दीपक दलाल (उपसरपंच पटणसावंगी) अजय केदार (माजी सरपंच पटणसावंगी) सतीश केदार सामाजिक कार्यकर्ते, अनिल राय सामाजिक कार्यकर्ते, बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. टाले व समस्त ग्रामवासी तसेच इत्यादी मान्यवरांची या शिबिराला उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणातून बोलत असताना सुनीलबाबू केदार यांनी शिबीरार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने कार्यरत राहून राष्ट्रहित जपावे, आपले गाव व आपला देशाचा विकास करण्यासाठी सक्रिय राहावे. एकजुटीने प्रत्येकच काम यशस्वी होत असते त्यामुळे तुम्ही सर्वांनी वेगवेगळे मार्ग न निवडता एकजूट होऊन काम केले तर कोणीच तुम्हाला थांबवू शकत नाही कारण एका कडीला तोडणे सोपे असते पण कड्यांचा बंध तोडणे कठीण असते म्हणून मिळून विकास करा असे आपल्या वक्तव्यातून शिक्षक व विद्यार्थ्यांच्या घनिष्ठ नात्याने शिक्षक विद्यार्थ्याचे उज्वल भविष्य घडवतात. व त्यांना देशसेवेसाठी प्रोत्साहित करून व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.प्रतिभा गढवे यांनी या शिबिराची दिनचर्या नियोजित करून विशेष कार्यक्रम राबवले. दररोज सकाळी प्रार्थना व महाविद्यालय मोहपा येथील प्रा. डॉ.विनोद भालेराव यांचे व्याख्यान झाले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना व आजचा विद्यार्थी या विषयावर मोहपा



प्रतिपादन त्यांनी केले. शिबिराच्या कार्यक्रमातील प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.जी.टाले यांनी केले २० ते २५ तारखेपर्यंत होणाऱ्या संपूर्ण दिनचर्येचा अहवाल त्यांनी समजावून सांगितला व रासेयो शिबीर या गावात घेण्यामागचा उद्देश काय आहे याबद्दल प्रतिपादन केले. मुक्ताताई कोक्कडे यांनी जागरूक नागरिक बनविण्यासाठी पुरेपूर प्रयत्नशील असतात. असे कौतुकास्पद वक्तव्य केले. सरपंच रोशनीताई ठाकरे यांनी शिबीरार्थ्यांना शुभेच्छा देऊन येत्या सातही दिवसात कुठलीही कमतरता जाणवल्यास सहकार्य करून पुरेपूर सहाय्य देण्यात येईल असे सांगितले. रा.से.योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.राजेन्द्र राऊत व्याख्यान, श्रमदान, अभ्यास वर्ग, विविध क्रीडा स्पर्धा, सायंकाळी व्यायाम , प्रार्थना व सांस्कृतिक कार्यक्रम असे नियोजन केले होते. कोराडी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राजेन्द्र वाटाणे यांचे संतांचे राष्ट्रीय योगदान यावर व्याख्यान झाले तसेच श्री स्वप्निल पुसे यांचे संविधान जागर यावर व्याख्यान झाले. बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयातील प्रा. डॉ.विद्याधर खरपूरिया यांचे व्याख्यान झाले. व्याख्यात्यांच्या ज्ञानदानातून होणाऱ्या ज्ञानार्जनासह विद्यार्थ्यांनी दररोज ग्रामस्वच्छता देखील केली.पाटणसावंगी येथील चक्रधरप्रभू देवालय, शिवाजी चौक, गणेश मंदिर व इतर सर्वत्र स्वच्छता मोहीम राबवली व पाटणसावंगी येथील नदीवर पाण्याचा निचरा होण्यासाठी विद्यार्थ्यांनी बंधारा देखील बांधला या उपक्रमाचे तेथील ग्रामस्थांनी व सरपंचानी भरभरून कौतुक केले. या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणातून बोलत असताना शिबीराथ्यांचे भरघोस कौतुक केले व जो बंधारा बांधण्यासाठी मजुरांना दोन दिवस लागणार होते तेच काम या चिमुकल्या हातांनी दोन तीन तासांत केले व याची आठवण आम्हाला सदैव राहिल असे सांगितले. पाटणसावंगी येथील सक्रिय सामाजिक कार्यकर्ते सतिश केदार यांनी शिबीरार्थ्यांना रासेयो हे गावकऱ्यांना माहिती नव्हते पण या चिमुकल्यांनी आमची मने जिंकली. यापुढेही दरवर्षी आपण याठिकाणी हे शिबीर घ्यावे. असे सांगितले. शिबीराथ्यांना मार्गदर्शन करताना वसुंधराताई चिमुरकर यांनी मुलींना प्रोत्साहितपर संभाषण करून जीवनात कितीही समोर गेले तरी मागे वळून नक्की बघायला पाहिजे. स्त्री ही सक्षम आहे तेव्हा शिक्षणासोबतच घरातील प्रत्येक काम आनंदाने करावे व लहान थोर सर्वांचा आदर करावा असे सांगितले शिबिराच्या उद्घाटनाचे व समारोपाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.प्रतिभा गडवे यांनी केले या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रा. डॉ.धनराज शेटे, प्रा. डॉ.गजानन सोमकुवर, प्रा डॉ. उमेश जनबंधू, प्रा. डॉ.संगीता चोरे, प्रा. डॉ.संगीता उमाळे, प्रा, डॉ, वर्षा बोपचे ,प्रा आनंद वंजारी, प्रा, शिल्पा घाटोळे, प्रा जया फाये, प्रा. अर्षद खान, प्रा. आकांक्षा गोरले, शिक्षकेतर कर्मचारी, पाटणसावंगी येथील ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केले. कर्मचारी अरुण सिंदुरकर व गणेश ढोके यांचे विशेष सहकार्य लाभले.

हिंगणघाटच्या ४ वर्षीय झोयान झिनशान शेखने ठेवला आपला पहिला रोजा

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे हिंगणघाट :
पवित्र रमजान महिन्यात शहरभर इबादत आणि रोजांच्या पालनाचा सिलसिला सुरू आहे. या काळात लहान मुलांमध्ये ही इबादतीब



दलची उत्साह दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर हिंगणघाट येथील झोयान झिनशान शेख (वय ४ वर्षे) याने आपला पहिला रोजा पूर्ण करून कुटुंबीय आणि नातेवाईकांना आनंदाचा क्षण दिला.अल्पवयात रोजा पूर्ण केल्याबद्दल कुटुंबीयांनी झोयानचे कौतुक केले आणि त्याच्यासाठी दुआ केली. या प्रसंगी घरात आनंदाचे वातावरण होते आणि नातेवाईकांनी त्याला शुभेच्छा दिल्या.रमजानचा पवित्र महिना रहमत, बरकत आणि माफीचा संदेश देणारा असून लोकांना इबादत, संयम आणि परस्पर बंधुभावाची शिकवण देतो.

पी आर पाटील इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी मध्ये विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन नृत्य स्पर्धेचे आयोजन

तळेगाव प्रतिनिधी
स्थानिक पी. आर. पाटील इन्स्टीटमुर ऑफ फार्मसी मध्ये दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन नृत्य स्पधेचे स्पर्धेचे आयोजन मंगळवार दि 10/03/2026 रोजी महाविद्यालयाच्या भव्य प्रागंणातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलामंच येथे आयोजित केलेला आहे. सदर स्पर्धेकरिता संपूर्ण विदर्भातून प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याकारणाने स्पर्धा यशस्वी होयाकरिता आयोजक अथक परिश्रम घेत आहे. पी आर पाटील औषधीनिर्माण महाविद्यालया ची ओळख ही फक्त गुणवत्तापूर्ण शिक्षण एवढीच मर्यादित नसून खेळ व कला यांची योग्य सांगळ घालून विद्यार्थ्यांना त्यांच्या कला गुणांना वाव देण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करून देणारे शौक्षणिक केंद्र म्हणून झालेली आहे. आयोजित आंतरमहाविद्यालयीन नृत्य स्पर्धा याचाच एक भाग आहे.या स्पर्धेत सोलो डान्स, डुएट डान्स व ग्रुप डान्स अश्या तीन प्रकारमध्ये आयोजीत असून विजेता व उपविजेत्या चमुस रोख व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. विदर्भातील जास्तीत जास्त फार्मसी महाविद्यालयानी आयोजित स्पर्धेत सहभागी होण्याचे आव्हान आयोजकानतर्फे करण्यात येत आहे.सदर विदर्भस्तरीय नृत्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ कोशिश गभने व संचालक डॉ विक्रांत सालोडे यांच्या मार्गदर्शनात सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी व विद्यार्थी मेहनत घेतं आहे.

फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

नागपूर, ७
नागपूरचे सुपूत्र फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश रवींद्र दुरगकर यांचा आसामच्या कार्बी आंगलोंग परिसरात भारतीय वायुसेनेचे सुखोई विमान कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत मृत्यू झाला. शनिवारी मानेवाडा घाट येथे शोकाकूल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे शौर्य, समर्पण आणि देशभक्तीचा अभिमान नागपूरसह संपूर्ण देशाला सदैव राहील या शब्दात राज्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर यांचे पार्थिव शुक्रवारी नवी दिल्ली येथे आणण्यात आले होते. तिथे मानवंदना दिल्यानंतर



पार्थिव येथील सोनेगाव एअरफोर्स स्टेशन आणण्यात आले. तेथून ते न्यू सुभेदार लेआउट येथील पूर्वेश दुरगकर यांच्या घरी कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आले. मानेवाडा घाट येथे शासकीय इतमामात पार पडलेल्या अंत्यसंस्कारावेळी जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर तसेच भारतीय हवाई दलातील वरिष्ठ अधिकारी, जवान आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. लष्करी परंपरेनुसार पूर्ण सन्मानात अंत्यसंस्काराची प्रक्रिया पार पडली. यावेळी जवानांनी हवेत राउंड फायर करून मानवंदना दिली. अंत्यसंस्कारावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, स्थानिक नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देवळी–पुलगाव मतदारसंघातील रस्ते व पुलांसाठी ३६ कोटींची तरतूद

आमदार बकाने यांनी मानले मुख्यमंत्री यांचे आभार

आरती कारंजेकर देवळी (प्रतिनिधी) देवळी–पुलगाव विधानसभा मतदारसंघातील रस्ते व पुलांच्या विकासासाठी राज्याच्या यावर्षीच्या अर्थसंकल्पात तब्बल ३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून यामुळे मतदारसंघातील वाहतूक व्यवस्था अधिक सुकर होणार आहे. या निधीमध्ये रस्ते सुधारणा व मजबुतीकरणासाठी ३० कोटी रुपये तर तीन पुलांच्या बांधकामासाठी ६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.या निधीबाबत माहिती देताना आमदार राजेश बकाने यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेऊन त्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्या पाठपुराव्याला यश मिळत राज्याच्या अर्थसंकल्पात विविध महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणा कामांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.या अंतर्गत शिरपूर–विजयगोपाल–पुलगाव रस्ता (रा.मा. २९५) या मार्गावरील कि.मी. २२/०० ते २४/६०० या भागात सुधारणा करण्यासाठी ४.५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच हिंगणघाट–वणी–शिरुड–अल्लीपूर–टाकळी (दरणे)–गिरोली रस्ता (रा.मा. ३३४) या महत्त्वाच्या मार्गावरील कि.मी. ७/००० ते ७/८०० आणि १७/०० ते २०/०० या भागातील कामांसाठी ४ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.याशिवाय सालोड–पडेगाव–चिकणी प्रजिमा–४८अ या रस्त्याच्या कि.मी. ०/५०० ते ५/०० या भागाच्या सुधारणा कामासाठी ४.५ कोटी रुपये, तर देवळी–दिघी–बोपापूर–सरूर प्रजिमा–६५ रस्त्याच्या कि.मी. १४/०० ते १९/२०० या भागासाठी ५.५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.ग्रामीण भागातील अंतर्गत रस्त्यांची स्थिती सुधारण्यासाठी धामणगाव–वाठोडा–दहेगाव गावंडे रस्ता (प्रजिमा–०८) कि.मी. ०/०० ते ४/०० या भागात मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी ४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच तरोडा–सावली–सास्ताबाद रस्ता (प्रजिमा–५०) कि.मी. ०/०० ते ५/०० सुधारणा कामासाठी ५ कोटी रुपये आणि वर्धा–वायफड–रसुलाबाद रस्ता (प्रजिमा–१०) कि.मी. २/०० ते ४/५०० मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी २.५ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.या सर्व कामांमुळे मतदारसंघातील ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून शेतीमाल वाहतूक, शिक्षण, आरोग्य सेवा तसेच बाजारपेठांशी संपर्क अधिक सुलभ होणार आहे.या विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार राजेश बकाने यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे विशेष आभार मानले असून, या कामांची अंमलबजावणी लवकरात लवकर सुरू करून गुणवत्तापूर्ण रस्ते निर्माण करण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.मतदारसंघातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून आगामी काळात आणखी विकासकामे मंजूर करून आणण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरूच राहील, असेही आमदार बकाने यांनी यावेळी सांगितले.

सरस्वती इन्स्टिट्यूशन मध्ये जागतिक महिला दिनी महिला नेतृत्वाचा सत्कार

कोराडी (दिलीप येवले):–
सरस्वती भवन कॉन्व्हेंट अँड हायस्कूल तसेच सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बोखारा येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात आणि आदरपूर्वक साजरा करण्यात आला. या प्रसंगी महिलांच्या उल्लेखनीय योगदानाचा आणि कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या शाळेच्या संस्थापक व संचालिका सौ. लता वाघ होत्या. तसेच या कार्यक्रमाला शाळेचे वरिष्ठ शिक्षक श्री. विजय वानकर उपस्थित होते, जे संस्थेचे एक अत्यंत महत्वाचे आणि आदरणीय आधारस्तंभ आहेत.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करण्यात आले, जे ज्ञान, प्रज्ञा आणि सशक्तीकरणाचे प्रतीक आहे.कार्यक्रमादरम्यान सौ. लता वाघ यांनी सर्व शिक्षकांना प्रेरणादायी व उत्साहवर्धक मार्गदर्शन केले. त्यांनी सर्वांना



समर्पण, आत्मविश्वास आणि अभिमानाने आपले कार्य सुरू ठेवण्यास प्रोत्साहित केले. तसेच शिक्षकवृंद आणि सहाय्यक कर्मचारी (दिदी) यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे, समर्पणाचे आणि निःस्वार्थ सहकार्याचे मनापासून कौतुक केले, जे संस्थेच्या प्रगती आणि यशामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.त्यांनी संपूर्ण कर्मचारीवर्गाचे मनःपूर्वक आभार मानले. कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांनी सर्व शिक्षक आणि दिदींना एक छोटासा सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला, ज्यामुळे हा कार्यक्रम अधिक खास आणि संस्मरणीय ठरला.सौ. लता वाघ यांचे सततचे मार्गदर्शन, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि मातृसुलभ पाठबळ हे संस्थेतील प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे समर्पण आणि सातत्याने दिलेले प्रोत्साहन संपूर्ण टीमला प्रामाणिकपणे आणि एकतेने शाळेच्या प्रगतीसाठी कार्य करण्याची प्रेरणा देते.या कार्यक्रमाचे सुयोग्य आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सना सय्यद यांनी केले होते. शिक्षण क्षेत्रातील महिलांची ताकद, समर्पण आणि कर्तृत्व यांचा सन्मान करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने महिला दिनाच्या भावनेचे प्रतिबिंब होता. महिलाच समाजाचा कणा आहेत आणि त्या भावी पिढ्यांना मार्गदर्शन करणारा प्रकाश आहेत, हा प्रभावी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप सर्व महिलांप्रती कृतज्ञता आणि आदर व्यक्त करून करण्यात आला."सशक्त महिला जगाला सशक्त बनवतात. प्रत्येक महिलेची ताकद, समर्पण आणि करुणा समाजाला अधिक मजबूत आणि उज्ज्वल बनवते.

महिलांना समाजात स्थान महत्वपूर्ण आहे

- डॉ. आबासाहेब उमाप

सातारा : स्वतःच्या घरापासून स्त्री-पुरुष समानता राखण्यासाठी पुरुषांनी पुढाकार घेतला पाहिजे.समाज सर्वांगसुंदर आरोग्यदायी सदृढ होण्यासाठी महिलांना पाठबळ दिले पाहिजे.कारण,महिलांना समाजात स्थान महत्वपूर्ण आहे.असे प्रतिपादन डॉ. आबासाहेब उमाप यांनी केले. येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ विविध संघटनांच्यावतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.तेव्हा डॉ.उमाप मार्गदर्शन करीत होते.अध्यक्षस्थानी काष्ट्राईब शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मारुती भोसले होते. डॉ.आबासाहेब उमाप म्हणाले,"शिव,फुले,शाहू व आंबेडकर विचासरधारा पुरुषांनी प्रथमतः घरात शिकवली पाहिजे.तरच समाजात प्रबोधन करता येईल." यावेळी संबोधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रमेश इंजे,धम्मशील चॅरिटेबल ट्रस्टचे विलासराव कांबळे,सुदर्शन इंगळे



महिला दिनानिमित्त अभिवादन करताना भन्ते दिंपकर, सभापती धनंजय जांभळे व मान्यवर

आदींनी मनोगत व्यक्त केली.प्रथमतः अनेक मान्यवरासह पालिकेचे सभापती धनंजय जांभळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.भन्ते दिम्पकर (थेरो) यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण विधी पार पाडला.सदरच्या कार्यक्रमास सम्यक ज्येष्ठ नागरिक संघाचे शामराव बनसोडे,बी.एल.माने,दै.ऐक्य जाहिरात विभागाचे सुरेश चिंचकर,गुरू आडागळे,शाहीर प्रकाश फरांदे,युवा शाहीर सत्यवान गायकवाड,डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष चंद्रकांत खंडाईत,सचिव गणेश कारंडे, सीताराम गायकवाड, मिलिंद पवार,प्रकाश सावंत, दिलीप सावंत,माणिक आढाव,अशोक कांबळे,डी. एस.भोसले,विलास कांबळे-आसगावकर,सयाजी बनसोडे,वामन मस्के,पी.टी. कांबळे,विलास वहागावकर, कपिल मट्टू,रवींद्र धडचिरे,किरण गाडे,सतीश गाडे,शशिकांत कांबळे,आदी विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.अनिल वीर यांनी सूत्रसंचालन केले.सरतेशेवटी बंधुत्व आदर्श गायिका कल्पना कांबळे, रिपाईच्या पदाधिकारी पूजा साळुंखे आदी महिलांनी अभिवादन करून चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

आई व शिक्षक हेच संस्काररूपी ज्ञान देतात

- जि.प.सदस्य राहुल शिंदे

सातारा : समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी संस्काररूपी ज्ञान आई व शिक्षकच देत असतात.असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे सदस्य राहुल शिंदे यांनी केले. येथील लेक व्ह्यू हॉटेलमध्ये वरिष्ठ मुख्याध्यापिका शंकूतला राजकुमार बनसोडे यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून शिंदे बोलत होते.अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी जयश्री शिंगाडे होत्या.यावेळी आरळे,शिवथर,कामठी केंद्र व विविध मान्यवर यांच्याकडून बनसोडे मॅडमचा सत्कार करण्यात आला.यावेळी अनेक मान्यवरासह सून,मुलगी,मुलगा, बहीण यांनीही भरभरून मॅडमबद्दल प्रसंग सांगुन त्यांनी घरापासून



शंकूतला बनसोडे यांचा सत्कार करताना कामठी केंद्रातील शिक्षकवृंद

शाळेपर्यंतचा प्रवास कथन केला. यावेळी पंचायत समितीचे सदस्य राजेश पवार,अवनी अजित साबळे,सुजाताताई, डी.व्ही.देवी,सौ.मापारी,मुख्याध्यापक महादेव पाटील, विस्ताराधिकारी मुळे, स्कुल कमिटीचे अध्यक्ष अजय साबळे, इंदिरा गायकवाड,अमोल घोरपडे,संगीत सणस,कुलकर्णी, वास्के मॅडम,राजेंद्र चोरगे, के.दत्तात्रय,भरत कदम,सौ.राजे, ए.ए.पाटील,आर.टी. गुजर, काळे,प्रा.पालेकर,प्रा.जयवंत जगताप,माजी नायब तहसीलदार महादेव बेबले,भरत चव्हाण,फाळके,सोनमळे, माजी केंद्रप्रमुख मारुती पाटील,कोरडे सर,प्रतिभा चौगुले,दत्तात्रय साबळे,किरण नाना साबळे पाटील,मीनाक्षी बनसोडे,स्वेता बनसोडे,लोखंडे, मनोहर माने,सुमित बनसोडे,गायकर, केंद्रप्रमुख भुरकुटे,विविध केंद्र शाळेतील मुख्याध्यापक-मुख्याध्यापिका,शिक्षक-शिक्षिका, प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षण संजीवनी राज्यस्तरीय पुरस्काराने मिना म्हसे सन्मानित

पुणे : राज्यस्तरीय "शिक्षण संजीवनी" या मासिकाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त जगतापवाडी शाळेच्या आदर्श शिक्षिका मिना म्हसे यांना शिक्षण संजीवनी राज्यस्तरीय पुरस्कार सहसंचालक महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. कमलादेवी आवटे, यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव जागतिक महिला दिनानिमित्त करण्यात आला असून या वर्षी हा सन्मान जगतापवाडी शाळेच्या आदर्श शिक्षिका मिना म्हसे यांना मिळाला. हा कार्यक्रम रविवारी



८ मार्च २०२६ रोजी पुणे येथील मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, टिळक रस्ता, शुक्रवार पेठ येथे सकाळी १०.३० वाजता संपन्न झाला. "शिक्षण संजीवनी" या राज्यस्तरीय मासिकाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचारांची प्रेरणा देण्याचे कार्य सातत्याने केले जाते. महिला दिनाच्या निमित्ताने कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा सन्मान करून समाजासमोर आदर्श उभा करण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे आहे, असे कार्यक्रमाचे संयोजक व शिक्षण संजीवनी मासिकाचे संपादक डॉ. संजय जगताप आणि कार्यकारी संपादक देविदास लिमजे यांनी सांगितले. यामध्ये स्मिता कुलकर्णी (उपाध्यक्ष, महर्षी कर्वे शिक्षण संस्था, पुणे), डॉ. राजश्री जायभाये (अॅकॅडमीक कौन्सिल मेंबर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) , प्रा. मीता चौधरी (संचालक, राजपथ अॅकॅडमी व प्रकाशन, पुणे), कल्पना गवरे (आयोजक, अक्षरविश्व साहित्य संमेलन, लंडन) , चंद्रलेखा बेलसरे (ज्येष्ठ साहित्यिका व उद्योजिका) यांचा समावेश होता. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करून त्यांना समाजासमोर प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून सादर करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजन "शिक्षण संजीवनी मासिक परिवार, पुणे" यांच्यावतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. संजय जगताप (कार्यकारी संपादक, शिक्षण संजीवनी मासिक) आणि देविदास लिमजे (संपादक, शिक्षण संजीवनी मासिक) हे असून सूत्रसंचालन सुनीता काटम यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. सतीश सातपुते, दत्तात्रय उभे, विद्याधर चव्हाण, महावीर जाधव, उज्वला जगताप, स्नेहा खडसे आणि देवयानी वैदनकर यांनी केले.महिला सक्षमीकरण, साहित्य संवर्धन आणि शिक्षण क्षेत्रातील कर्तृत्वाचा गौरव या तिहेरी उद्दिष्टाने आयोजित हा कार्यक्रम साहित्यप्रेमी, शिक्षक आणि कवींसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना या निमित्ताने आयोजकांनी व्यक्त केली आहे.

धामणी गावात नारी शक्ती बोलती झाली. महिला दिनी उलगडली स्वकर्तुत्वाची गाथा

(कैलास गायकवाड) लोणी प्रतिनिधी

धामणी ता.आंबेगाव येथील जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने यावेळी उद्योग - व्यवसाय क्षेत्रामध्ये अहोरात्र कर्तव्य पार पाडणाऱ्या महिलांनी आपल्या स्वकर्तुत्वाची गाथा यावेळी ऐकवली. धामणीचे ग्रामस्थ आणि शिवतीर्थ पतसंस्था यांनी नारी शक्तीचा गौरव करून त्यांच्यासाठी खुले व्यासपीठ निर्माण करून दिले होते. ३० महिलांनी आपल्या यशस्वी कारकिर्दीचे पैलू यावेळी बोलन दाखवले.शिवतीर्थ पतसंस्थेचे अध्यक्ष ऍड. विठ्ठल जाधव, यांनी महिला दिनाच्या या कार्यक्रमाची भूमिका मांडली.सरपंच अक्षय विधाटे, उपाध्यक्ष आनंदराव जाधव, माजी सरपंच सागर जाधव, अंकुश भूमकर, रुपेश विधाटे , मोहम्मद तांबोळी,माजीपंचायत समिती सदस्य रवींद्र करंजखेले यांनी



महिलांच्या या कर्तव्याबद्दल कौतुक करून गावाला गौरवास्पद असणाऱ्या पुढील यशस्वी महिलांचा गौरव करण्यात आला.सायली गणेश रोकडे ,निलोफर सरदार इनामदार ,शैला श्रीकांत विधाटे ,हिराबाई दगडू करंजखेले,शालन वसंत यादव ,शबाना अस्पाक इनामदार, संगीता सुनील सासवडे ,सुवर्णा रोडे, रुपाली रवींद्र वाघ, सुमित्रा रोकडे, संगीता दत्तात्रय जाधव, स्वाती ज्ञानेश्वर विधाटे,अलका विष्णू विधाटे, शबाना गुलाब इनामदार,संगीता ठकाराम भगत, नजमा पठाण, भावना ढगे, आशा शिवाजी भंडारकर,मनीषा सोमनाथ बोऱ्हाडे ,वैशाली नितीन जाधव मनीषा सुनील बोऱ्हाडे,संध्या राजेंद्र रोकडे, तनुजा रुपेश विधाटे ,मोहिनी स्वप्नील तांबे, सोनाली राहुल करंजखेले,रोहिणी संतोष जाधव, या कार्यक्रमाचे आयोजन धामणी ग्रामस्थ व शिवतीर्थ ग्रामीण पतसंस्था यांनी केले होते.

वांगे-भाकरी महाप्रसादाची अनोखी परंपरा जपणारा भोसलेवाडीचा एकनाथ षष्ठी उत्सव

उंब्रज / (अमोल पवार)

कराड तालुक्यातील भोसलेवाडी येथे श्री गोपालनाथ महाराज आसन मंदिरात साजरा होणारा श्री एकनाथ षष्ठी उत्सव हा पंचक्रोशीतील भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा अनोखा सोहळा ठरतो. दि. ९ ते ११ या कालावधीत तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असून ग्रामस्थांचा उत्साह पाहण्यासारखा असतो. अनेक वर्षांची परंपरा जपत हा उत्सव दरवर्षी भक्तिभावाने साजरा केला जातो.या उत्सवाला श्रीक्षेत्र त्रिपुटी मठाधिपती गुरुवर्य श्री गुरुनाथ घोलप यांचे मार्गदर्शन लाभत असून श्री. सुनील महाराज घोलप, श्री. सुधीर महाराज घोलप, श्रीपाद महाराज घोलप, श्री. सुरेशराव साखवळकर,



प.पु. श्री. दिगंबरदास घारे महाराज (पुणे), ॲड. डी. व्ही. देशपांडे यांच्यासह नाथभक्तांची प्रमुख उपस्थिती लाभत आहे. दिंडी सोहळा, अभिषेक, महापूजा, ध्वजारोहण, कीर्तन, प्रवचन, भजन, पालखी सोहळा, दहीहंडी, गोपाळकाला तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारून जातो.या उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे वर्षानुवर्षे जपली गेलेली वांगे-भाकरी महाप्रसादाची अनोखी परंपरा. साधे पण मनाला भिडणारे असे हे प्रसाद भोजन भाविकांना एकत्र आणते. या प्रसादासाठी पंचक्रोशीतील तसेच दूरवरच्या गावांमधून भाविक मोठ्या संख्येने भोसलेवाडी येथे येतात. अनेक भक्त खास वांगे-भाकरीचा प्रसाद घेण्यासाठीच या उत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात. साधेपणातही भक्तीची गोडी जपणारी ही परंपरा गावाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक ओळखीचा एक महत्त्वाचा भाग बनली आहे.उत्सवाच्या आयोजनासाठी भोसलेवाडीतील युवक वर्ग, महिला मंडळे आणि ज्येष्ठ ग्रामस्थ मोठ्या मेहनतीने कार्यरत असतात. प्रसादाची तयारी, भाविकांसाठी व्यवस्था, मंदिर परिसर स्वच्छ ठेवणे, धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन अशा सर्व कामांमध्ये गावकरी एकदिलाने सहभागी होतात. गावातील एकोप्याचे आणि सेवाभावाचे सुंदर उदाहरण या उत्सवातून पाहायला मिळते.दि. ११ रोजी सामुदायिक भजन, काल्याचे कीर्तन, महाआरती, गुलाल समर्पण व महाप्रसादानंतर तीन दिवसीय श्री एकनाथ षष्ठी उत्सवाची सांगता होणार आहे. या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री गोपालनाथ देवस्थान ट्रस्ट व भोसलेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रजासत्ताक दिन परेडमधील यशात योगदान; वाईच्या अमरीन इनामदारचा साताऱ्यात सन्मान

(वाई प्रतिनिधी : प्रशांत थोरवे)

वाई : नवी दिल्ली येथे 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त राजपथावर पार पडलेल्या भव्य संचलन सोहळ्यात महाराष्ट्र शासनाच्या 'श्री गणेश – आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या चित्ररथाने देशात प्रथम क्रमांक पटकावून राज्याचा मान उंचावला. या चित्ररथाच्या सादरीकरणात वाई शहरातील कुमारी अमरीन आजीम इनामदार हिचेही मोलाचे योगदान राहिले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत जागतिक महिला दिनानिमित्त (दि. 8 मार्च) सातारा येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य अंतर्गत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, सातारा यांच्या वतीने तिचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.नवी दिल्ली येथे पार पडणारी प्रजासत्ताक दिनाची परेड ही देशातील सर्वात प्रतिष्ठेची आणि लक्षवेधी घटना मानली जाते. विविध राज्ये आपल्या संस्कृती, परंपरा व प्रगतीचे दर्शन घडविण्यासाठी



आकर्षक चित्ररथ सादर करतात. यावर्षी महाराष्ट्र शासनाच्या 'श्री गणेश – आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथाने अत्यंत प्रभावी सादरीकरण करत परीक्षक आणि उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या उत्कृष्ट सादरीकरणाला देशात प्रथम क्रमांक मिळाल्याने महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.या चित्ररथाच्या सादरीकरणात अमरीन इनामदार हिने आपली कला, मेहनत आणि समर्पण यांद्वारे मोलाचे योगदान दिले. तिच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महिला दिनाच्या निमित्ताने सातारा येथे तिचा गौरव करण्यात आला. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, सातारा सुनिल जाधव यांच्या हस्ते तिला सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.अमरीनच्या या नेत्रदीपक यशाचे कौतुक यापूर्वीही अनेक मान्यवरांनी केले आहे. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले तसेच सातारा जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार उदयनराजे भोसले यांच्या हस्तेही तिचा गौरव करण्यात आला असून तिच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले आहे.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी अमरीनच्या कार्याचे अभिनंदन करत तिच्या जिद्द, मेहनत आणि कलेचे कौतुक केले. ग्रामीण भागातील मुलींनी विविध क्षेत्रात पुढे येऊन आपले कर्तृत्व सिद्ध करावे, यासाठी अमरीनचे यश प्रेरणादायी ठरेल, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.या सत्कार समारंभाला अमरीन इनामदार हिचे वडील अजीम इनामदार हे देखील उपस्थित होते. आपल्या मुलीच्या या यशाबद्दल त्यांनी आनंद व्यक्त करत तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.अमरीन इनामदार हिच्या या यशामुळे वाई शहरासह सातारा जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल झाले असून तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महिला दिनाच्या निमित्ताने झालेला हा गौरव वाई शहरासाठी अभिमानाची बाब ठरत आहे.